# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी , अकोला द्वारा
संचालित

# श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

## नियमित कार्यक्रम अहवाल

## सत्र २०२१ –२२

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**संलग्नित**

**दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित**

# श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

## रा.से.यो. नियमित कार्यक्रम अहवाल

## सत्र : २०२१-२०२२

**दि. ०६/०८/२०२१ वृक्षारोपण कार्यक्रम (Greenery):**

६ ऑगस्ट २०२१ रोजी वन विभाग अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड करण्याचे कार्य केले. हे कार्यक्रम शिवापूर, अकोला (वन-महोत्सव) येथे करण्यात आले. आज 06/02021 रोजी SHRI RLT कॉलेज ऑफ सायन्स अकोला च्या NSS आणि NCC टीमने जिल्हा वन कार्यालय, अकोला यांच्या सहकार्याने सनसिटी जवळील शिवापूर येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. आदरणीय प्राचार्य डॉ. व्ही. डी. ननोटी आणि एनएसएस पीओ डॉ. रश्मी जोशी सावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे 15 NSS स्वयंसेवक आणि 12 NCC विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण मोहिमेत सहभाग घेतला. 3 वर्षांपासून हा उपक्रम जिल्हा वन कार्यालयाच्या सहकार्याने केला जातो. RLT टीमने एकूण 75 रोपे लावली. आजच्या कार्यक्रमासाठी श्री अर्जुन के. आर. उप वनसंरक्षक उपस्थित होते. श्री. सुरेश वडोदे, सहाय्यक श्री. वनसंरक्षक श्री.इंगळे, राऊंड ऑफिसर व वनरक्षक राजेश बिडकर यांनी उपस्थित राहून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

लिंक : Plantation Program at Shivapur - Shri R.L.T. College of Science, Akola (rltsc.edu.in)

**दि. ०९/०८/२०२१ ऑगस्ट क्रांती दिन**

रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी क्रांती दिनाबद्दल अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. व्ही डी नानोटी ह्यांनी गांधीजींच्या भारत छोडो आंदोलन बद्दल विद्यार्थ्यांना सांगितले जेणेकरून महात्माजींचे राष्ट्रप्रेम, अहिंसा, त्याग ह्या सर्व गुणांवर प्रकाश टाकलं. विद्यार्थ्यांनी २ मिनिटांचा मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहिली. विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात डॉ. जोशी ह्यांनी क्रांती दिनाचे महत्व सांगितले, "मुंबईत भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात महात्मा गांधींनी केलेली 'छोडो भारत' ची गर्जना आणि दिलेला "करेंगे या मरेंगे" हा मंत्र नऊ ऑगस्टच्या दिवशी संपूर्ण देशात पसरला होतात्यामुळे या . दिवशी क्रांतीची ज्योतच जणू पेटलीदेशभरात ब्रिटिश सत्ते .ला हाकलून लावण्यासाठी आंदोलनांना सुरवात झाली."

**दि.१४ ऑगस्ट २०२१**: श्री रालतो च्या रासेयो चमूने दत्तक ग्राम येथे **दि. १४ ऑगस्ट २०२१** रोजी रोपटयांचे वितरण केले व गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविला. **दि. १५ ऑगस्ट २०२१** ला महाविद्यालय परिसरातिल रोपवाटिकेत, मान. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी व IQAC समन्वयक डॉ. आर. एल. राहाटगांवकर ह्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करिता महाविद्यालयातील प्रा. वैशाली बडगुजर, प्रा. सुजाता ताडम, डॉ. अंजली सांगोले, डॉ. सुशील नागराळे व इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी कार्यक्रमाच्या यशस्विते करिता प्रयत्न केल.

**दि. १५/०८/२०२१ : ७५ वे स्वातंत्र्य दिवस:**

दि. १४/०८/२०२१ पत्र क्र. संगाबाअवि/रासेयो/१७/७६/२०२१ च्या अनुषंगाने श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला साजरा करण्यात आले. भारत देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिवसाच्या निमित्ताने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. **"India's Development in the field of Science & Technology / विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचा विकास"** हा विषय देण्यात आला होता. स्पर्धे करिता **४७ विद्यार्थ्यांनी** उत्स्फूर्त प्रातिसाद दिला. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर असे ७५ वर्षांचे देशातील Science & technology बद्दल झालेले फायदे आणि तोटे ह्यांचा अतिशय चांगल्या व साध्या पद्धतीत, आपली मते मांडून त्यांचे वर्णन केले आहे. कमीत कमी ५०० शब्दांत निबंध लिहावयाचे होते.

गुगल form लिंक : https://forms.gle/fMy6fF7PjSGjqHCG9

Spreadsheetlink:
https://docs.google.com/spreadsheets/d/12GTWIndBTvhvR8a9J2NH1AeGFIc1meexsKeqXGztlQg/edit?usp=sharing

स्पर्धेतुन एक मराठी भाषेतिल आणि एक इंग्रजी भाषेत निबंध निवडण्यात आले. निवड करण्याकरिता म्हणूनपरीक्षक म्हणून रसायन शास्त्र विभगाचे डॉ. प्रदिप द्वेहाते ह्यांनी कार्य पाहिले. प्रत्येक भाषेतील एक निबंध निवडून दिलेत व विजेत्यांना ५००/ रोख असे पारितोषिक देण्यात आले. सर्वोत्कृष्टनिबंध निवड करण्याकरिता रसायन शास्त्र विभागाचे सहयोगी प्रा. डॉ. प्रदीप पी. देवहाते ह्यांनी काम पहिले.

| Sr. No. | Name of student | Class | Language | Winners Prize |
|---|---|---|---|---|
| 1. | चेतन अरुण पंडितकर | BSc-I (P3) | मराठी | Cash 500 Rs. |
| 2. | प्राजक्ता गजानन लव्हाळे | BSc-II (B5) | English | Cash 500 Rs |

**दि. ०५/०९/२०२१ श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे शिक्षक दिन साजरा:**

श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात ५/०९/२०२१ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाक्रीष्णन ह्यांच्या जयंतीला शिक्षक दिन साजरा केला गेला. महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी निबंध स्पर्धेचे आयोजन केले. शिक्षक दिनानिमित्य स्लोगन्स (घोष वाक्य) व कविता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. **विषय होता "शिक्षक: समाज परिवर्तनाचे माध्यम".** दिलेल्या विषयावर कविता आणि घोष वाक्य हे मराठी किंवा इंग्लीश मागविण्यात आले. दिलेल्या लिंक वर आपले नाव नोंदवून घोषवाक्य किंवा कविता लिहिली किंवा pdf मधे अपलोड केलीत. दोन्ही भाषांमधुन एक घोषवाक्य व एक कविता निवडल्या गेले. बेस्ट स्लोगन व बेस्ट कविता करिता पारितोषिक प्रदान करण्यात आले.

**दि.२४/०९/२०२१ "राष्ट्रीय सेवा योजना" स्थापना दिवस साजरा :**

NSS day च्या निम्मित्ताने NSS युनिट कडून मलकापूर स्थित सूर्योदय बाल-गृह येथे कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर आणि डॉ. समाधान मुंडे ह्यांनी ६०००/ च्या उपयोगी वस्तू व खाद्य पदार्थांचे वितरण केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याकरिता आम्ही विविध बालगृह, अनाथ-आश्रम, वृद्धाश्रमाला भेटी देवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आव्हान करीत असतो.

राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, हे आहेमहाविद्यालयाचा परिसर स्वच्छ . करणे, क्रीडांगणे तयार करणे, ग्रामीण विभागातील रस्ते बांधणे, प्रौढ शिक्षण, गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार, नागरी संरक्षण इ.कार्यक्रमांचा या योजनेत समावेश आहे . हि जाणीव निर्माण करण्या करीताच राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली.

**दि.२/१०/२०२१ महात्मा गांधी जयंती**:

राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यंच्या जयंती आणि निमित्य COVID-१९ च्या मार्गदर्शक नियमांचे पालन करून, मास्क्चे वापर, सामाजिक अंतर ठेवून श्री रा.ल.तो. महाविद्यालयाच्या रासेयो पथकाने स्वच्छता दुतांचे सत्कार केले व त्यांना मास्क चे आणि sanitizer वितरण केले. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्य ह्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. स्वच्छं भारत स्वस्थ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता दूतांनी महाविद्यालयाचे परिसर, वर्ग खोल्या स्वच्छ केल्या व संपूर्ण परिसर sanitize करण्यात आले. रासेयो च्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता केली व संत गाडगे महाराजांनी दिलेल्या **"स्वच्छते कडून समृध्दी कडे"** चा महामंत्र अमलात आणण्याचे कार्य केले.

**दि. ९ ते १० ऑक्टोबर २०२१: SWAS team S. P. Office (अकोला जिल्हा पोलीस दल) अकोला च्या महिला सुरक्षा व सक्षमीकरण कार्यक्रमामध्ये रासेयो चा सहभाग:**

अकोला जिल्हा पोलीस दल ने **"कर्तव्य योगिनी सन्मान सोहळा"** ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालयाच्या NSS च्या विद्यार्थीनि व कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी सहभाग नोंदविला. डॉ. रश्मी जोशी ह्यांनी विविध स्पर्धाचे परीक्षक म्हणून कार्य पहिले. रासेयो विद्यार्थीनिनी cyber crime संबंधी आणि महिला सक्षमीकरण बद्दलचे व्याक्यान मध्ये सहभाग घेतलं व भरपूर माहिती व ज्ञानाचे संग्रह केले.

**दि. १९ ऑक्टोबर २०२१: "आझादी का अमृत महोत्सव" निमित्य एकता दिवस साजरा- CRPF जवानांच्या सायकल रैली चे स्वागत:**

**राष्ट्रीय सद्भावना रॅली:** १९/१०/२०२१ रोजी, आझादी का अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी CRPF द्वारे आयोजित "राष्ट्रीय सद्भावना रॅली" साठी CRPF जवानाची सायकल रॅली गडचिरोली येथून सुरू झाली आणि गुजरात येथे स्टॅच्यू ऑफ युनिटी, (सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या 31 ऑक्टोबर 2021 रोजी जयंती निमित्त) समाप्त झाली. रॅली चे श्री आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे रासेयो चमू व प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी हयांच्या हस्ते सर्व सैनिक व अधिकाऱ्यांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. चीफ कमांडंट सी.आर.पी.एफ. यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. RLTians साठी हा अभिमानाचा क्षण होता. कार्यक्रमासाठी

एन.एस.एस युनिट ने परिश्रम घेतले. डॉ. एस. आर. कोहचाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे आणि शारीरिक शिक्षण संचालक डॉ. चंद्रवंशी, श्री. सौरभ म्हात्रे, श्री. अंभोरे व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**दि. २५ नोवेंबर ते २ डिसेंबर २०२१: Mission Yuva Swasthya अंतर्गत २५ N.S.S. स्वयंसेवकांनी (Covid Warriors) म्हणून, कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने लसीकरण जनजागृती करिता मोहीम राबविली.**

गुरुवार दिनांक 28 ऑक्टोबर 2021 रोजी एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना), एनसीसी, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभाग आणि श्री आरएलटी कॉलेज ऑफ सायन्स, अकोला यांच्या आयक्यूएसी द्वारे अकोला महानगरपालिकेच्या सहकार्याने "कोविड-19 लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मिशन युवा स्वास्थ अभियान. 18 वर्षांवरील एकूण 93 विद्यार्थ्यांना कोविशील्ड लसीचे डोस देण्यात आले. प्राचार्य डॉ.व्ही.डी. नानोटी यांनी शिबिराचे उद्घाटन केले तर डॉ. अनुप चौधरी, अकोला एमएनसीच्या डॉ. अस्मिता पाठक आणि डॉ. मीनल सिवाल मॅडम आणि अकोला जीएमसीचे डॉ. अश्विन तिवारी उपस्थित होते. अॅड. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मोतीसिंगजी मोहता, सोसायटीचे सचिव डॉ.पवनजी माहेश्वरी यांनी शिबिराला भेट दिली. एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे, सह-अधिकारी सौ. सोनाली गावंडे आणि श्री. शैलेश जैस्वाल, डॉ. राजेश चंद्रवंशी, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक लेफ्टनंट डॉ. आर. एम. अग्रवाल, एन.सी.सी. आणि IQAC समन्वयक डॉ. आर. एल. रहाटगावकर आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लसीकरणाच्या उदात्त हेतूसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनएसएस स्वयंसेविका रुतुजा ठाकरे, अचल तायडे, वैष्णवी दातीर, तिथी मिरजामले, कृष्णा बगाडिया, हर्षल गिराम, संकेत ढंगे, मोहित शर्मा आणि एनसीसी कॅडेट पियुष मोहोड, अमर पवार, विवेक भाटिया, यश वाघमारे, राम ढोरे यांनी परिश्रम घेतले.




दिनांक 16 नोव्हेंबर 2021 रोजी NSS समन्वयकांसाठी बैठक बोलावण्यात आली होती. त्या बैठकीत एनएसएस स्वयंसेवकांमार्फत कोविड लसीकरणाबाबत जनजागृतीसाठी संपूर्ण वेळापत्रक तयार करण्यात

आले. वेळापत्रकानुसार श्री आरएलटी कॉलेज ऑफ सायन्सच्या स्वयंसेवकांनी छान पथनाट्याचे आयोजन केले होते. डॉ.रश्मी जोशी आणि एन.एस.एस. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएस टीमने वेगवेगळ्या ठिकाणी हे नाटक सादर केले. या पथनाट्याचे, महानगरपालिका अकोलाचे उपायुक्त यांनी कौतुक केले. पथनाट्याच्या सादरीकरणासाठी डॉ. अस्मिता पाठक, डॉ. अनुप चौधरी, आरोग्य विभाग, महानगरपालिका अकोला उपस्थित होते. सुमारे 14 स्वयंसेवकांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. MNC अकोल्याच्या कॉल सेंटरसाठी चार मुली स्वयंसेवकांनी काम केले. कुटुंबातील सदस्यांना शक्य तितक्या लवकर लसीकरण करण्यासाठी स्वयंसेवक दूरध्वनीद्वारे कुटुंबांना जागरूक केले. मुलींनी 4 दिवस काम केले आणि कोविड योद्धा म्हणून मदत केली. कॉर्पोरेशन आणि कोविड केंद्रांनी दिलेल्या भागात लसीकरण न झालेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे 10 स्वयंसेवकांनी काम केले. भरतीया हॉस्पिटल, कोविड सेंटर, ओल्ड सिटी अकोला येथील डॉ. मुदगल यांनी विद्यार्थ्यांना सर्वेक्षणासाठी वेगवेगळी क्षेत्रे दिली. 25 NSS स्वयंसेवक आणि संपूर्ण युनिटने २५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत अकोला महानगरपालिके सोबत एक आठवडा कोविड वॉरियर्स म्हणून परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. व्ही.डी. नानोटी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे यांनी मोहीम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कॉलेजच्या NSS युनिटने केलेल्या सामाजिक कार्याबद्दल आणि उदात्त कार्याबद्दल सोशल मीडियावर आणि वर्तमानपत्रात आणि चॅनेलवर NSS युनिटबद्दल कौतुकाचे शब्द उमटले होते. विविध कार्यक्रमांच्या जिओटॅग फोटोंसह सर्व बातम्यांचे कटिंग्ज येथे जोडलेले आहेत. बातम्यांच्या काही लिंक्स आणि F.M. रेडिओ आणि कॉलेजची वेब लिंकही इथे दिली आहे.

https://youtu.be/UA7ns3S0PE8

* rrcdigital youtube channel* 👇
https://youtube.com/c/RRCDIGITALAKOLA

*FM Radio Facebook Channel and News Links
https://www.facebook.com/100036094211314/videos/1518873981814985/

https://satyaladha.blogspot.com/2021/11/19.html

*College Website Link For the Campaign:
https://www.rltsc.edu.in/2021/10/31/covid-19-vaccination-camp-held-at-our-college/

*youtube link for the street play on Covid Vaccination Awareness campaign:
https://youtu.be/oGB0y7K28ho

https://photos.app.goo.gl/5k3MBpViuA8WxJBu9

**२६ नोव्हेंबर २०२१: भारतीय संविधान दिवस:**

दि. २६/११/२०२१ रोजी महाविद्यालयाच्या संविधान प्रांगणात दिवस साजरा केला गेला. विद्यार्थ्यांना संविधान बद्दल माहिती देऊन शपथ देण्यात आली कि, “संविधानात दिलेल्या सर्व गोष्टींचे मान राखून त्यांचे योग्य पालन करणार”. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. नानोटी होते. विद्यात्यींसाठी लायब्री मध्ये भारतीय संविधानाचे पुस्तक वाचन करण्याकरिता उपलब्ध केले गेले. २६ नोव्हेंबर ला रासेयो

पथकाद्वारे संविधान दिवस साजरा केला गेला , संविधान  प्रीआम्बलचे वाचन करण्यात आले. संविधान चा मान राखण्या बद्दल शपथ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

**२८ नोव्हेंबर २०२१: महात्मा ज्योतिबा फुले ह्यांची पुण्यतिथी:**

लोकांमध्ये शिक्षणाचे बी रोवणारे, क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले ह्यांच्या पुण्यतिथी निमित्त्या अभिवादन कार्यक्रम गेण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याबद्दल माहिती करून देण्यात आली. २६ नोव्हेंबर ला रासेयो पथकाद्वारे संविधान दिवस साजरा केला गेला , संविधान  प्रीआम्बलचे वाचन करण्यात आले. संविधान चा मान राखण्या बद्दल शपथ देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.

**१ डिसेम्बर २०२१ जागतिक एड्स दिवस- रेड रिबन क्लब ची स्थापना**

१ डिसेम्बर २०२१ जागतिक एड्स दिवसचे औचित्य साधून "रेड रिबन क्लब" ची स्थापना व गठन करण्यात आले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. वी. डी. नानोटी हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना समाजात एड्स बद्दल जनजागृती करावयास उद्बोधित केले.

**रक्तदान शिबीर (दि. २४/१२/२०२०)**

**"रक्तदान-श्रेष्ठदान"** या संकल्पनेतून हे सामाजिक कर्तव्य पार पाडण्याकरिता रा.से.यो. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, क्षेत्रीय समन्वयक ह्यांनी एकजुटीने हे आव्हान स्वीकारले. **"चला तर मग रक्तदान करूया - सामाजिक बांधिलकी जपूया"** हि भावना मनात बाळगून दिनांक २४/१२/२१ रोजी श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालयातिल रासेयो पथकाद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वर्गीय प्राचार्य श्री म. गो. जोशी, ह्यांच्या स्मृती प्रीत्यर्थ रक्तदान शिबिराचे प्रत्येक वर्षी २४ डिसेंबर ला आयोजन करण्यात येते.  **५० रक्तदात्यांनी ह्या शिबिरात रक्तदान केले**. महाविद्यालयातील रा.से.यो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ. समाधान मुंडे, क्षेत्रिय सम. व DMC समन्वयक डॉ. सुधीर कोह्चाले ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालयातील NCC व Sports विभाग सुद्धा ह्या सामाजिक कार्यात सहभागी झाले होते. प्रत्येकाने आपले कर्तव्य अचूक रित्या पार पाड्ण्याकरिता प्रयत्न केले. अकोला Govt. Medical College रक्तपेढी च्या संयुक्त विद्यमाने ह्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. विजय नानोटी, प्रमुख पाहुणे श्री. अनुप गोसावी, रक्त संक्रमण अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला आणि वैद्यकीय समुपदेशक तायडे मॅडम ह्यांची विशेष उपस्थिती लाभली. २४ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ९ ते ११ ह्या कालावधीत महाविद्यालयाच्या सभागृहात हे कार्यक्रम यशस्वीरीत्या घेण्यात आले. NSS व DMC आणि इतर विद्यार्थ्यांनी, स्वयंसेवकांनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी शिस्तीचे पालन करून रक्तदान केले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी ह्यांचे मार्गदर्शन लाभले व त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व रक्तदात्यांचे कौतुक करून आभार व्यक्त केले.


**दि. १/१/२०२२: "No Vehicle day" पर्यावरण पूरक उपक्रम राबविला:**

१ जानेवरी २०२२ हा दिवस रा.से.यो. कडून "No Vehicle day" म्हणून साजरा करण्यात आला. विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी ह्या सर्वांना सायकल आणायची सक्ती करून इंधन वाचविण्याचे प्रयत्न केल्या गेले. तसेच प्रदूषणावर नियंत्रण करण्यासाठी सर्वांचे आव्हान करण्यात आले. डॉ. रश्मी

जोशी ह्यांनी पर्यावरण सुरक्षा करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे हि भावना विद्यार्थ्यान मध्ये रुजविण्याचे काम केले. प्रत्येक महिनाच्या पहिल्या तारखेला हे उपक्रम राबविण्यात येत आहे.

### दि. १२/०१/२०२२: युवा-दिन साजरा

"राष्ट्रीय युवा दिन" साजरा करण्या करिता श्री आर.एल.टी. सायन्स कॉलेज, अकोला च्या राष्ट्रीय सेवा योजना व पालक शिक्षक संघटना समिती आणि IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने पालक आणि विद्यार्थ्यांसाठी "कोविड महामारी दरम्यान पोषण सशक्तीकरण" या विषयावर कार्यशाळा आणि संवादात्मक सत्राचे आयोजन केले होते. अतिथी वक्त्या म्हणून डॉ. सोनल कामे आंबेरे, सहायक प्राध्यापिका, गृहविज्ञान, श्रीमती. आर.डी.जी. महाविद्यालय अकोला ह्या लाभल्या. आजच्या तरुणांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती आणि डॉ. कामे ह्यांनी, कोविड महामारीच्या काळात तंदुरुस्त राहण्यासाठी सकस आहार आणि पोषण कश्याप्रकारे घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी सुमारे 209 विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदविला होता. संवादात्मक सत्र खूप चांगले होते. अनेक विद्यार्थी व पालकांनी आपल्या शंकांबाबत पाहुण्या वक्त्याशी चर्चा केली. प्राचार्य, डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपस्थितांना मूल्ये जपण्यासाठीचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ. रश्मी जोशी, डॉ. ए. एस. सावरकर, पालक शिक्षक संघाच्या समन्वयिका आणि श्री. शैलेष जयस्वाल, आयोजन समितीचे सदस्य म्हणून कार्य केले. संवाद सत्र हे यशस्वी रित्या पर पडले.




### दि. ११-१७ जानेवारी २०२२: "रस्ता सुरक्षा सप्ताह" साजरा

**"रस्ता सुरक्षा सप्ताह"** दर वर्षी जानेवारी महिन्यात साजरा केला जातो, **११ ते १७ जानेवारी २०२२ हे "रस्ता सुरक्षा सप्ताह"** म्हणून साजरा करण्यात आला. श्री रा ल तो विज्ञान महाविद्यालय अकोलाचे

रासेयो पथक व उप प्रादेशिक परीवाहन कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्‌यमाने रस्ता सुरक्षा साप्ताहाचे आयोजन करण्यात आले. डॉ. रश्मी जोशी सावलकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या उपस्थितीत रासेयो स्वयंसेवकांनी **“रस्ता सुरक्षा जीवन रक्षा”** जनजागृती केली. डॉ समाधान मुंड, कार्य.अधि., प्रा. शैलेश जयस्वाल व प्रा. सोनाली गवांदे सह कार्य. अधि. ह्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले. मा. प्राचार्य डॉ. नानोटी ह्यांनी उप-प्रादेशिक परिवहन विभागाचे आभार व्यक्त केले.

**दि. १९/०२/२०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली:**

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महविद्‌यालायाचे प्राचार्य मा. डॉ. व्ही. डी. नानोटी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे, नॉन टिचिंग प्रमुख श्री चंद्रकांत अहिरकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आजच्या युवा पिढीने शिवाजी महाराजांचे चरित्र वाचून आपले व्यक्तिमत्व विकास करावे असे आहवान केले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अगदी शिवमय वातावरणात रासेयो कार्य. अधि. डॉ. समाधान मुंडे ह्यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली.

**दि. १४/२/२०२२ ते २१/०२/२०२२: राष्ट्रीय एकता शिबीर भुवनेश्वर ला सहभाग नोंदविला:**

राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता शिबीर भुवनेश्वर येथे आयोजित करण्यात आले होते. ह्या शिबिराला शंतनू सुनीलराव वावगे आणि कृष्णा शुक्ला ह्या दोन स्वयंसेवकांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्‌यापिठाकडून सहभागी झाले होते.





| | |
|---|---|
|  |  |


**दि. २३ फेब्रुवारी २०२२ संत गाडगे महाराज जयंती:**

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे व डॉ. रश्मी जोशी सावलकर ह्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वी. डी. नानोटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली संत गाडगे महाराज ह्यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेवून विद्यार्थ्यांचे उद्बोधन करण्यात आले. रासेयो चे आराध्य दैवत संत गाडगे बाबा ह्यांच्या दश-सुत्री बद्दल जागृती करण्यात आली. त्यांनी दिलेला स्वच्छतेतून समृद्धी कडेचा मार्ग अवलंबिला पाहिजे असे आव्हान केले.

**दि. ३/३/२०२२ अकोला जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेला सहभाग:**

रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व ४ स्वयंसेवक भूषण गोंडचवर, शंतनू सुनीलराव वावगे, कु. निलेश्वरी राजेश वरणकार आणि कु. कीर्ती मुकेश गुप्ता ह्यांनी सहभाग नोंदविला. डॉ. जोशी ह्यांनी कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी दुपार च्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून कार्य पहिला. कु निलेश्वरी हिने CPR चे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यान समोर प्रस्तुत केले. रासेयो चे मा. संचालक डॉ. राजेश बुरंगे, अकोला जिल्हा समन्वयक डॉ. रतन येउल, NDRF चे ऑफिसर्स, कार्यक्रम अधिकारी डॉ. डिम्पल मापारी ह्यांच्या उपस्थितीत ह्या सत्राचे आयोजन करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| कु. कीर्ती मुकेश गुप्ता | कु. निलेश्वरी राजेश वरणकार | भूषण विष्णू गोंडचवर | शंतनू सुनीलराव वावगे |








**दि. ३१/०३/२०२२: रासेयो अकोला जिल्हा शिबिराला उपस्थिती:**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ च्या रासेयो विभाग अंतर्गत अकोला जिल्ह्याचे रासेयो श्रम संस्कार शिबीर २६ मार्च ते २ एप्रिल २०२२ दरम्यान अकोट तालुक्यात, देऊळगाव येथे आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे ६ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. ३१/०३/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या रासेयो कडून डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी नियोजित केलेले काम पूर्ण केले. त्या दिवशी दुपारच्या सत्रात दर.जोशी ह्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शविली.


स्वच्छ भारत, स्वस्थ भारत
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
राष्ट्रीय सेवा योजना
जिल्हास्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर
दि. २६ मार्च २०२२ ते ०२ एप्रिल २०२२
* निमंत्रण पत्रिका *
* विनीत *
डॉ. राजेश बुरंगे
* उपक्रम *
बुक-पोस्ट
प्रति,


शनिवार दि. २६ मार्च २०२२
रविवार दि. २७ मार्च २०२२
सोमवार दि. २८ मार्च २०२२
मंगळवार दि. २९ मार्च २०२२
बुधवार दि. ३० मार्च २०२२
गुरुवार दि. ३१ मार्च २०२२
स्वच्छ भारत, सुंदर भारत, उज्वल भारत
शुक्रवार दि. १ एप्रिल २०२२
शनिवार दि. ०२ एप्रिल २०२२
ग्राम विकास व उन्नत भारत



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७२१-२६६८०६८ Email : directornss@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१७/२४६/२०२२
दिनांक : २४.०३.२०२२

प्रति,
मा. प्राचार्य, (सहपत्रिप्रमाणे)
रासेयो संलग्नित महाविद्यालय,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

**विषय : "स्वच्छ भारत-स्वस्थ भारत" जिल्हास्तरीय विशेष श्रमसंस्कार (अकोला जिल्हा) शिबीरामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित राहण्याबाबत...**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती राष्ट्रीय सेवा योजना यांच्या व्दारे **दत्तक ग्राम सुकळी, दहीहांडा,** जि. अकोला येथे सत्र २०२१-२२ या वार्षिक कालावधी मधील स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्य विद्यापीठस्तरीय **"स्वच्छ भारत-स्वस्थ भारत"** अकोला जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर **दि. २६/०३/२०२२ ते दि. ०२/०४/२०२२** या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराला अकोला जिल्ह्यातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक (प्रति महाविद्यालय २ मुले व २ मुली) एकुण २०० स्वयंसेवक शिबीरार्थी म्हणुन सहभागी होत आहे.

करीता या शिबीराच्या यशस्वी व सुत्रबध्द आयोजन व नियोजनाकरीता खालील वेळापत्रकानुसार नियुक्त आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी / क्षेत्रिय समन्वयक (पुरुष व महीला) यांची प्रति २ दिवस शिबीर स्थळी उपस्थित राहुन दिलेली जबाबदारी पुर्ण करावी असे कळविण्यात येत आहे. कृपया नोंद घेऊन तातडीने संबंधितांना कळवावे, ही विनंती.

| अ.क्र. | कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव | महाविद्यालयाचे नाव | शिबीर स्थळी उपस्थित राहण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | डॉ. स्मिता देवर | श्रीमती आर.डी.जी. महिला महा. अकोला | दि. २७ ते २८ मार्च, २०२२ |
| २ | डॉ. मोनिका साबू | श्रीमती एल.आर.टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोला | दि. २७ मार्च, २०२२ |
| ३ | प्रा. अमोल मार्कंडे | सिताबाई कला, विज्ञान व वाणिज्य महा. अकोला | दि. २८ मार्च, २०२२ |
| ४ | प्रा. रामकृष्ण गावंडे | भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश महा. पिंजर | दि. २९ मार्च, २०२२ |
| ५ | डॉ. रेखा काळबांडे | भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश महा. पिंजर | दि. २९ मार्च, २०२२ |
| ६ | डॉ. सुभेष कावडे | शंकरलाल खंडेलवाल महा. अकोला | दि. ३० मार्च, २०२२ |
| ७ | डॉ. डिम्पल मापारी | शंकरलाल खंडेलवाल महा. अकोला | दि. ३० मार्च, २०२२ |
| ८ | डॉ. रश्मी जोशी | आर.एल.टी. विज्ञान महा. अकोला | दि. ३१ मार्च, २०२२ |
| ९ | प्रा. समाधान मुंडे | आर.एल.टी. विज्ञान महा. अकोला | दि. ३१ मार्च, २०२२ |
| १०. | डॉ. जी.एम. खोकाडे | श्री. शिवाजी कॉलेज अकोला | दि. ०१ एप्रिल, २०२२ |
| ११ | प्रा. कपीला म्हैसने | श्री. शिवाजी कॉलेज अकोला | दि. ०१ एप्रिल, २०२२ |
| १२ | डॉ. राहूल माहोरे | डॉ. एच.एन.सिन्हा महा. पातुर | दि. ०२ एप्रिल, २०२२ |
| १३ | डॉ. नेमिचन्द्र चव्हाण | सुधाकरराव नाईक महा. अकोला | दि. ०२ एप्रिल, २०२२ |
| १४ | डॉ. दिपक राऊत | सरस्वती कला महा. दहीहांडा | दि. २६ मार्च ते ०२ एप्रिल, २०२२ |
| १५. | डॉ. सुधिर कोहचाळे | आर.एल.टी. विज्ञान महा. अकोला | दि. २६ मार्च ते ०२ एप्रिल, २०२२ |

आपला,

(डॉ.राजेश बुरंगे)
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**दि. १४ एप्रिल २०२२: डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ला "भारताचा संविधान" ह्या विषयावर मान. प्रा. पळसपगार, सहायक प्राध्यापिका, वनस्पतीशास्त्र ह्यांनी खूप सुंदर असे व्यख्यान दिले. मान.प्राचार्य डॉ. वी.डी. नानोटी हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रा. वंदना पळसपगार ह्यांचे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. रश्मी जोशी आणि डॉ. समाधान मुंडे ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. डॉ. मुंडे ह्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार हि मानले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मा. प्राचार्य ह्यांनी अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेबांच्या विचारांवर आपले उद्गार व्यक्त केले.

**दि. २२/०४/२०२२ ला आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे रासेयो च्या विद्यार्थ्यांचा सहभाग:**

२०२१-२२ चे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे २२ ते २५ एप्रिल २०२२ ह्या दरम्यान आयोजित करण्यात आले. २२ एप्रिल २०२२ ल महाविद्यालयातील ६ विद्यार्थ्यांनी एक नाटिका तेथे सदर केली. नाटीकेची स्क्रिप्ट भूषण गोंडचवर ह्याने लिहिली. **महिला बचत गट, शिक्षण, दारू बंदी व आरोग्य** ह्या पहलुंवर आधारित होती. नाटिकेच नांव **"नेहमीचे गाराने"** हे होत.

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>कु. हेतल जाधव</td><td>कु. वैष्णवी चव्हाण</td><td>कु. वैष्णवी चवळे</td><td>कु. रुपाली लाउडकर</td></tr>
<tr><td></td><td></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>शिवराज ठाकरे</td><td>भूषण गोंडचवर</td><td colspan="2">नाटिका सदर करतांना रासेयोचे विद्यार्थी</td></tr>
</table>

**दि. 25/04/2022 राज्य स्तरीय पुरस्काराने सन्मानित (२०१९-२०)**

25/04/2022 रोजी SNDT विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई येथे 2019-20 या वर्षाचे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा पार पडला. डॉ. रश्मी जोशी सावळकर यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार आणि श्री आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोला यांना 2019-20 या वर्षासाठीचा सर्वोत्कृष्ट NSS युनिट म्हणून गौरविण्यात आले. 2016-17 चा राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार श्री. अतुल राऊत यांना प्रदान करण्यात आले. सर्व पुरस्कार मा. राज्यमंत्री श्री उदयजी सामंत, उच्च शिक्षण व तंत्रज्ञान ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## वृत्तपत्र कात्रणे

# माझं शहर

## आरएलटी विज्ञान महाविद्यालयाने राबविला वृक्षारोपण कार्यक्रम



अकोला ■ बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित आरएलटी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना पथकातर्फे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. होते. सदर उपक्रम अकोला जिल्हा वन विभाग यांचे संयुक्त विद्यमाने शिवापूर येथे आयोजित करण्यात आला.

**शिवापुरात ७५ रोपट्यांचे वृक्षारोपण**

आरएलटीचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या मार्गदर्शनात रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी -सावलकर, डॉ.समाधान मुंडे तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ. रोहीतकुमार अग्रवाल यांनी राबविला. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना दोन्ही पथक मिळून २७ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवित सुमारे ७५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपवन संरक्षक के.आर. अर्जुना उपस्थित होते. वन विभागातील सहायक वन संरक्षक सुरेश वाळोदे, वनपाल इंगळे,वनरक्षक राजेश बिडकर यांचे सहकार्य लाभले. पर्यावरण जागृती अंतर्गत आरएलटी विज्ञान महाविद्यालयाने राबविलेल्या या उपक्रमाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे तर्फे स्वागत करण्यात आले.

ePaper देशोन्नती Thu, 12 August 2021 https://deshonnati.digit

# मातृभूमि

## श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाने राबविला वृक्षारोपण कार्यक्रम



अकोला। दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना पथका तर्फे नुकतेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. होते. सदर उपक्रम अकोला जिल्हा वन विभाग यांचे संयुक्त विद्यमाने शिवापूर येथे आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी यांच्या मार्गदर्शनात रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी सावलकर, डॉ.समाधान मुंडे तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ. रोहीतकुमार अग्रवाल यांनी राबविला. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना दोन्ही पथक मिळून २७ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला व ७५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत मा.श्री. के.आर. अर्जून, उपवन संरक्षक यांची लाभली.

वन विभागातील सहायक वन संरक्षक सुरेश वाळोदे, वनपाल इंगळे व वनरक्षक राजेश बिडकर यांचे सहकार्य लाभले. पर्यावरण जागृती अंतर्गत महाविद्यालयाने राबविलेल्या या उपक्रमाचे श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे तर्फे अभिनंदन करण्यात आले. सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाने वन विभागाचे आभार मानले.

# लसीकरण वाढवण्यासाठी पथनाट्याद्वारे जनजागृती

अकोला ता. २७ : कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाची गती वाढावी यासाठी आरएलटी महाविद्यालयातील एनएसएस व एससीसी कॅडेट्सनी शनिवारी (ता. २७) स्थानिक आय.एम.ए. हॉल आणि मनपा कार्यालया समोर, गांधी चौक येथे पथनाट्याद्वारे जनजागृती केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी कोरोना लस का घ्यावी, कोरोना लस सुरक्षित आहे, तसेच लसीकरणामुळे कोरोना आजार हा पूर्णपणे संपतो, याचा कोणताही साईड इफेक्ट नाही, कोरोना लस घेतल्यानंतरही सोशल डिस्टसिंग नियमाचे पालन करणे तसेच चेहऱ्यावर मास्क लावणे आदीबाबत गायन, नृत्य व नाटीका सादर करून जनजागृती केली. यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून नागरिकांनी पथनाट्याचा आस्वाद घेवून लसीकरणाचे महत्व जाणून घेतले.

यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंकज जावळे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अस्मिता पाठक, मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर मुदगल, डॉ. अनुप चौधरी, आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी, डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे आदींची उपस्थिती होती. यावेळी आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयाचे ऋतुजा दांदळे, वैष्णवी दांदळे, हर्षल विराम, उज्वल पटेल, शंतनू वावगे, भूषण गोंडचावरे, कृष्णा शुक्ला, अनुष्का उगले, आरती नाकट, प्रतीक्षा देशमुख, सोनल गावंडे, प्रियंका वर्ठे, वैष्णवी हिंगळकर, पियुश मोहोड, यश वावमारे, अमोल ग्वार, सुयोग भोजने या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.



अकोला : महापालिकेसमोर पथनाट्याद्वारे जनजागृती करताना विद्यार्थी.

अकोला, रविवार, २८ नोव्हेंबर २०२१ | ३



पथनाट्याच्या माध्यमातून कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत जनजागृती करताना 'आरएलटी'च्या विद्यार्थिनींनी

# पथनाट्यातून कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत केली जनजागृती

## आर.एल.टी. कॉलेजच्या विद्यार्थिनींचा पुढाकार

प्रतिनिधी | अकोला

पथनाट्याच्या माध्यमातून कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाबाबत जनजागृती करण्यात आली. यासाठी आर.एल.टी. कॉलेजच्या विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला.

महानगरपालिका क्षेत्रामधून कोरोनावर संपूर्णपणे नियंत्रण आणण्यासाठी तसेच शहरातील प्रत्येक नागरिकाची कोरोना या रोगाकरीता रोग प्रतिकारक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कोरोनाची लस घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्या अनुषंगाने आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयातील एनएसएस आणि एनसीसी कॉर्डिनेटरतर्फे आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या समुदाये आय.एम.ए. हॉल आणि मनपासमोर पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

यावेळी मनपा उपायुक्त डॉ.पंकज जावळे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अस्मिता पाठक, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रभाकर मुदगल, डॉ.अनुप चौधरी, आर.एल.टी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय नानोटी, डॉ.रश्मी जोशी, डॉ.समाधान मुंडे उपस्थित होते. पथनाट्य सादरीकरण करणारे आर.एल.टी विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनींमध्ये ऋतुजा दांदळे, वैष्णवी दांदळे, हर्षल जीराम, उज्वल पटेल, शंतनू वाक्षे, भूषण गोंडचावर, कृष्णा शुक्ला, अनुष्का उगले, आरती नाकट, प्रतीक्षा देशमुख, सोनल गावंडे, प्रियंका वरठे, वैष्णवी हिरूळकर, पीयूष मोहोड, यश वाघमारे, अमोल पवार, सुयोग भोजने आदींचा समावेश होता.

**अशी केली जनजागृती**

विद्यार्थ्यांनी कोरोना लस का घ्यावी, कोरोना लस सुरक्षित आहे, तसेच लसीकरणामुळे कोरोना आजार हा संपूर्णपणे संपतो, याचा कोणताही साइड इफेक्ट नाही, कोरोना लस घेतल्यानंतरही फिजिकल डिस्टन्सिंगचे (कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शारिरीक अंतर ठेवणे) पालन करणे तसेच चेहऱ्यावर मास्क लावणे आदींबाबत गायन, नृत्य व नाटिका सादर करून जनजागृती केली. पथनाट्य पाहण्यासाठी नागरिक उपस्थित होते. त्यांना पथनाट्याच्या माध्यमातून लसीकरणाचे महत्त्व लक्षात आले.

**लसीकरण करून घ्या :** कोरोना विषाणूच्या नियंत्रणासाठी आणि संपूर्णपणे हद्दपार करण्यासाठी नागरिकांनी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करावे. आपल्या व परिवारातील प्रत्येक सदस्याचे लसीकरण करून घेऊन स्वतः व कुटुंबीयांचे संरक्षण करण्याचे, आवाहन आयुक्त कविता द्विवेदी यांनी केले आहे.

अकोला-वाशीम अकोला, सोमवार, २९ नोव्हेंबर २०२१ ७

# रा. ल. तो.च्या विद्यार्थ्यांनी लसीकरणासाठी केले पथनाट्य



पथनाट्य सादर करताना आर. एल. टी.च्या विद्यार्थिनी

• अकोला, २८ नोव्हेंबर

शहरात कोरोनावर संपूर्णपणे नियंत्रण आणण्यासाठी तसेच शहरातील प्रत्येक नागरिकाची रोग प्रतिकारक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कोरोनाची लस घेणे अत्यंत गरजेचे असून त्या अनुषंगाने येथील रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयातील एनएसएस आणि एनसीसी विद्यार्थ्यांच्या समूहाद्वारा शहरातील आय. एम. ए. हॉल, मनपा कार्यालयासमोर आणि गांधी चौकात पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी कोरोना लस का घ्यावी, कोरोना लस सुरक्षित आहे, तसेच लसीकरणामुळे कोरोना आजार हा संपूर्णपणे संपतो, याचा कोणताही इतर वाईट परिणाम होत नाही, कोरोना लस घेतल्यानंतरही भौतिक अंतराचा नियमाचे पालन करणे तसेच चेहऱ्यावर मुखाच्छादन लावणे आदींबाबत गायन, नृत्य व नाटिका सादर करून जनजागृती केली.

यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिकांची उपस्थिती होती. नागरिकांनी पथनाट्याचा आनंद घेऊन लसीकरणाचे महत्त्व जाणून घेतले. कोरोनाच्या नियंत्रित ठेवण्यासाठी आणि संपूर्णपणे हद्दपार करण्यासाठी शहरातील नागरिकांनी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करून आणि आपले व परिवारातील प्रत्येक सदस्यांचे लसीकरण करून घ्यावे व स्वतःचे व परिवाराचे संरक्षण करण्याचे आवाहन मनपा आयुक्त कविता द्विवेदी यांनी केले आहे.

यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंकज जावळे, आरोग्य अधिकारी डॉ. अस्मिता पाठक, डॉ. प्रभाकर मुदगल, डॉ. अनुप चौधरी, प्राचार्य डॉ. विजय नानोटी, डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे आदींची उपस्थिती होती. रा. ल. तो. चे विद्यार्थी ऋतुजा दांदळे, वैष्णवी दांदळे, हर्षल जिराम, उज्वल पटेल, शंतनू वाक्षे, भूषण गोंडचावर, कृष्णा शुक्ला, अनुष्का उगले, आरती नाकट, प्रतीक्षा देशमुख, सोनल गावंडे, प्रियंका वरठे, वैष्णवी हिरूळकर, पियुष मोहोड, यश वाघमारे, अमोल पवार, सुयोग भोजने आदींनी यात सहभाग घेतला.

(तरुण भारत)

मातृभूमि

# अकोला सिटी

अकोला, रविवार
२८ नोव्हेंबर २०२१

## कोविड - १९ : आर.एल.टी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

# लसीकरणासंदर्भात पथनाट्य सादर करून केली जनजागृती

मातृभूमि वृत्तसेवा

। अकोला , दि. २७ ।

अकोला महानगरपालिका क्षेत्रामधून कोरोना या आजाराचे संपुर्णपणे नियंत्रण आणण्यासाठी तसेच शहरातील प्रत्येक नागरिकाची कोरोना या रोगाकरीता रोग प्रतिकारक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कोरानाची लस घेणे अत्यंत गरजेचे असून त्या अनुषंगाने आर. एल. टी विज्ञान महाविद्यालयातील एनएसएस आणि एनसीसी कॉर्डिनेटर यांच्या तर्फे आर. एल.टी विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या चमुव्दारा शहरातील आय.एम.ए. हॉल आणि मनपा कार्यालय समोर, गांधी चौक येथे पथनाट्याव्दारे जनजागृती करण्यात आली.





यावेळी विद्यार्थ्यांनी कोरोना लस का घ्यावी, कोरोना लस सुरक्षित आहे, तसेच लसीकरणामुळे कोरोना आजार हा संपुर्णपणे संपतो, याचा कोणताही साईड इफेक्ट नाही, कोरोना लस घेतल्यानंतरही सोशल डिस्टसींग नियमाचे पालन करणे तसेच चेह-यावर मास्क लावणे आदिंबावत गायन, नृत्य व नाटिका सादर करून जनजागृती केली. यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवून नागरिकांनी पथनाट्याचा आस्वाद घेऊन लसीकरणाचे महत्व जाणून घेतले.

कोरोनाला नियंत्रीत ठेवण्यासाठी आणि संपूर्णपणे हद्दपार करण्यासाठी शहरातील नागरिकांनी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करून आणि आपले व परिवातील प्रत्येक सदस्यांचे लसीकरण करून घेऊन स्वतःचे व परिवाराचे संरक्षण करण्याचे आवाहन मनपा आयुक्त कविता व्दिवेदी यांनी आवाहन केले आहे. यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंकज जावळे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अस्मिता पाठक, मनपा वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर मुदगल, डॉ.अनुप चौधरी, आर. एल. टी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी, डॉ. रश्मी जोशी, डॉ. समाधान मुंडे आदींची उपस्थिती होती तसेच पथनाट्य सादरीकरण करणारे आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थीनी ज्यामध्ये ऋतुजा दांदळे, वैष्णवी दांदळे, हर्षल क्षिरसागर, उज्वल पटेल, शंतनू वावरे, भूषण गोळघाटे, कृष्णा शुक्ला, अनुष्का जाले, आरती नाकट, प्रतिक्षा देशमुख, सोनल गावंडे, प्रियंका वर्टे, वैष्णवी हिरूळकर, मिथुरा मोहोड, यश वायनारे, अमोल पवार, सुयोग भोजने आदींचा समावेश होता.

# उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांचे हस्ते विद्यापीठ रासेयो पुरस्काराचे वितरण

अमरावती दि. २१ | प्रतिनिधी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेला गेल्या तीन वर्षामध्ये महाराष्ट्र शासनातर्फे राष्ट्रीय सेवा योजना पथकातील उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरीय नऊ पुरस्कार प्राप्त झाले असून त्यामध्ये चार उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी, चार उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक आणि एक उत्कृष्ट महाविद्यालय यांचा समावेश आहे. सर्व पुरस्कार प्राप्तकर्त्यांना दि. २५ एप्रिल, रोजी मुंबई येथे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांचे शुभहस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.

२०१६-१७ मध्ये उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगांव राजा, जि.



बुलढाणाचे डॉ. विनोद बन्सिले यांना, तर सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक म्हणून श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे अतुल राऊत यांना पुरस्कार देण्यात आला आहे. २०१८-१९ मध्ये उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून भारतीय महाविद्यालय, मोर्शी,जि. अमरावतीचे डॉ. संदिप राऊत यांना, तर सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक म्हणून शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचे अमित शिंदे यांना पुरस्कार देण्यात आला आहे.

२०१९-२० मध्ये सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून श्री राधाकिसन लक्ष्मणनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला या महाविद्यालयाला, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून श्री राधाकिसन लक्ष्मणनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोलाच्या डॉ. रश्मी जोशी (सावलकर) यांना, तर सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेविका म्हणून श्रीमती ल. रा. तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोलाची सपना बाबर हिला पुरस्कार देण्यात आला आहे. २०२०-२१ मध्ये उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, जि. वाशिमचे डॉ. योगेश पोहोकार यांना, तर सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक म्हणून श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीचे डॉ. अमर कर्तोरे यांना पुरस्कार देण्यात आला आहे.

राष्ट्रीय सेवा योजना पथकातील उत्कृष्ट कार्याबद्दल सर्व पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी अभिनंदन केले आहे.

देशोन्नती

# आरएलटी विज्ञान महाविद्यालयाची राज्यस्तरीय पुरस्कारांची हॅट्ट्रिक!

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अकोला** ▪ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार वितरण सोहळयात प. विदर्भच नव्हे तर विदर्भात विज्ञान शाखेत अग्रेसर आरएलटी विज्ञान महाविद्यालयाने यंदा बाजी मारीत पुरस्कारांची हॅटट्रिक साधली आहे.

दरम्यान, मुंबई येथे एसएनडीटी विद्यापीठात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधीतील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध संवर्गात उत्कृष्ट कार्य करणारे पथक, कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक यांना प्रदान करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी कुलगुरू डॉ.उज्वला चक्रदेव, कुलगुरू डॉ. ए.एम. पातुरकर, रासेयोचे राज्य सल्लागार अंकीत प्रभू, राज्य सल्लागार अधिकारी डॉ. प्रशांतकुमार वनंजे आदिंच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

तसेच संस्था अंतर्गत एलआरटी वाणिज्य महाविद्यालयास राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार सपना बाबर हिला २०१९.२० करीता प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. विजय नानोटी, डॉ. रश्मी जोशी सावलकर तसेच अतुल राऊत यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे समन्वयक डॉ.राजेश बुरंगे व अकोला जिल्हा रासेयो समन्वयक प्रा. रतन येउल प्रामुख्याने उपस्थित होते. आरएलटीच्या या नेत्रदीपक यशाबध्दल महाविद्यालयास प्राप्त या नेत्रदिपक यशाबध्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे रासेयो समन्वयक डॉ.राजेश बुरंगे,ािजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड.मोतीसिंह मोहता, वरिष्ठ उपाध्यक्ष विजय तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ.रविंद्र जैन, मानद सचिव पवन माहेश्वरी, सहसचिव इंजि.अभिजित परांजपे व कार्यकारीणी सदस्य महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग यांनी स्वागत केले आहे.

## राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार वितरण

सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कारासह, डॉ. रश्मी जोशी, अतूल राऊत सन्मानित या पुरस्कार योजनेत अकोल्याच्या आरएलटी विज्ञान महाविद्यालयास तीन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यामध्ये राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार डॉ. रश्मी जोशी - सावलकर यांना २०१९-२० व उत्कृष्ट राज्यस्तरीय स्वयंसेवक पुरस्कार अतुल राऊत सत्र २०१६-१७ करिता असे एकुण तीन राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.



आरएलटीच्या या नेत्रदीपक यशाबध्दल महाविद्यालयास प्राप्त या नेत्रदिपक यशाबध्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे रासेयो समन्वयक डॉ. राजेश बुरंगे,ािजीई सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता, वरिष्ठ उपाध्यक्ष विजय तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष डॉ. रविंद्र जैन, मानद सचिव पवन माहेश्वरी, सहसचिव इंजि.अभिजित परांजपे व कार्यकारीणी सदस्य महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग यांनी स्वागत केले आहे.

Deshonnati Edition
May 3, 2022 Page No. 7
Powered by : eReleGo.com

# महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त रासेयो सत्कारमूर्तींचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार



अमरावती दि.८ : महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार देवून गौरविण्यात आलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्तींचा कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या शुभहस्ते विद्यापीठात सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाकडून रासेयो सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार श्री. राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील प्राचार्य. डॉ. विजय नानोटी, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार श्री. राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील डॉ. रश्मी पी. जोशी (सावलकर), कार्यक्रम अधिकारी पुरस्कार श्री. व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगांव राजा, जि. बुलढाणा येथील डॉ. विनोद रतिराम बन्सिले, कार्यक्रम अधिकारी पुरस्कार भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि. अमरावती येथील डॉ. संदिप मनोहर राऊत, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार श्रीमती. ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथील कु. सपना सुरेश बाबर, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील अमित संजय शिंदे, कार्यक्रम अधिकारी पुरस्कार श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा (लाड) येथील डॉ. योगेश मधुकर पोहोकार, सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार श्री. शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील श्री. अमर अनिल कतोरे यांचा सत्कार यावेळी कुलगुरूंनी केला.

सत्कारप्रसंगी कुलगुरू म्हणाले, रासेयोच्या माध्यमातून समाजाला जोडण्याचे काम केले जाते. रासेयोमध्ये सहभागी होण्याचा विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकसित होत असून भविष्याकरिता त्याला त्याचा फायदा होतो. केवळ पुरस्कारप्राप्तीसाठी काम न करता सातत्याने रासेयोच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त काम करावं. रासेयो संचालकांनी व्हिजन वाढवावे आणि या माध्यमातून रासेयोचे कार्य जास्तीत जास्त समाजापर्यंत पोहचवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

संचालन रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी केले. प्राचार्य डॉ. विवेक नानोटी व डॉ. रश्मी जोशी यांनी या प्रसंगी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच कर्मचारी उपस्थित होते.

TheHitavada
NAGPUR ■ Wednesday ■ May 11 ■ 2022



## BRIEFS

### Final list for Shikshak Sahakari Bank polls out

■ Amravati Bureau
AMRAVATI, May 10

DEPUTY District Registrar (Co-operative Society) office have released the final voters' list having 8,174 voters for the ensuing elections for 21 posts of directors of Amravati Zilla Parishad Shikshak Sahakari Bank. The list has been revised and names of 217 voters out of 8,391 have been removed and thus list of 8,174 voters have been finalised. Draft voters' list was declared for the ensuing Shikshak Sahakari Bank election and objections and suggestions were

# Dr Malkhede honours NSS' State-level awardees



Dr Dileep Malkhede along with awardees.

■ Amravati Bureau
AMRAVATI, May 10

DR DILEEP Malkhede, Vice-Chancellor from Sant Gadgebaba Amravati University, recently honoured State-level National Service Scheme awardees under the jurisdiction of Sant Gadgebaba Amravati University in a programme held at the University recently.

Dr Dileep Malkhede honoured Dr Vijay Nanoti, Principal of Radhakisan Laxminarayan Toshniwal Science College, Akola, who won State Government's NSS Best College Awardee; Rashmi Joshi (Sawarkar), Best Programme Officer Awardee of Shri Dr Radhakisan Laxminarayan Toshniwal College of Science, Akola, Dr Vinod Bansile, Programme Officer Awardee from Shri Vyankatesh College of Arts, Commerce and Science, Deulgoan Raja in Buldana District, Dr Sandeep Raut, Programme Officer awardee from Bhartiya Mahavidyalaya, Morshi, Sapna Suresh Babar, Best Volunteer Awardee from LRT College of Commerce, Akola, Amit Sanjay Shinde, Best Volunteer Awardee from Government Vidarbha Institute of Science and Humanities, Amravati, and Dr Yogesh Pohokar, Programme Officer Awardee from Smt Shakuntalabai Dhabekar College, Karanja (Lad) and Amit Katore, Best Volunteer awardee from Shivaji College of Arts, Commerce, Amravati.

Speaking on the occasion, Dileep Malkhede said that the work of connecting society is done through NSS. Students participating in NSS go through a good personality developing and it benefits them in future. NSS students should work as much as possible, not for reward only. He hoped that NSS directors would enhance their vision and reach out to community through NSS work.

Dr Rajesh Burange, NSS Director, conducted the proceeding. Dr Vivek Nanoti and Dr Rashmi Joshi expressed their views on the occasion. Dr Tushar Deshmukh, Registrar, Dr Vilas Nandurkar, Public Relations Officer and staff were present.

# छायाचित्रे













अकोला जिल्हा वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी आणि स्वयंसेवाकांकडून शिवापूर (मलकापूर ) येथे वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात आला.




महाविद्यालयातिल आवारात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली, म्हणून जागोजागी स्टीकर्स लावण्यात आले.



संगाबा अमरावती विद्यापीठाच्या रासेयो कडून COVID योद्धांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता , त्या कार्यक्रमाला डॉ. जोशी यांचा सहभाग.







५/९/२०२१ ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ह्यांच्या प्रतिमेला धार अर्पण करून शिक्षक दिन साजरा केला व त्या निमित्य घोषवाक्य व कविता स्पर्धेचे आयोजन केल्या गेले.







२४/०९/२०२१ राष्ट्रीय सेवा योजना चे स्थापना दिवसाचे औचित्य साधून रासेयो च्या डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे आणि विद्यार्थ्यांनी ६०००/ चे खाद्य पदार्थ व आवश्यक वस्तूंचे सूर्योदय बाल-गृह (मलकापूरला) येथे बालकांना वितरीत केल्या.







२/१०/२०२१ ल महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीला स्वच्छता दुतांचे N-95 मास्क व sanitizers देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या सोबत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे परिसर स्वच्छ केले.












दि. ९ व १० ऑक्टोबर २०२१ ल अकोल जिल्हा पोलीस दल (SWAS TEAM) कडून आयोजित **कर्तव्य योगिनी सन्मान** कार्यक्रमाला डॉ. जोशी व रासेयो च्या मुलींचा सहभाग.







१९/१०/२०२१ रोजी, आझादी का अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी CRPF द्वारे आयोजित "राष्ट्रीय सद्भावना रॅली" साठी CRPF जवानाची सायकल रॅली चे श्री रालतो महाविद्यालयात स्वागत कार्यक्रम .







२६/११/२०२१ रोजी महाविद्यलयात संविधान दिवसाला थोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून विद्शयार्पथी व शिक्षक ह्यांना शपथ देण्यात आली.






महानगरपालिकेत काल सेंटरवर कॅल्स करतांना विद्यार्थिनी व उप-आयुक्त जावळे ह्यांच्या कार्यालयात लसीकरण जन्जागुती करण्या करिता घेण्यात आलेली सभा.







अकोला city चानेल वर जनजागृती करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी , उप-आयुक्त जावळे ह्यांच्या हस्ते सत्कार.







COVID Task Force चे कोविड लसीकरण मोहिमे अंतर्गत सर्वेक्षण करतांना रासेयो स्वयंसेवक.







२०/१२/२०२१ ल संत गाडगे महाराज ह्यांच्या पुण्यतिथीला अभिवादन कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना गाडगे महाराजांच्या दश-सूत्री बद्दल माहिती देण्यात आली.












महाविद्रयालयाचे पहिले प्राचार्य स्वर्गीय म.गो. जोशी हयांच्या स्मृती प्रीत्यर्थ रक्तदान शिबीर २४/१२/२०२१ रोजी आयोजित करण्यात आले.




No Vehicle Day १/१/२२ ला पर्यावरण संवर्धना करिता आयोजित करण्यात आला.




३/१/२०२२ ला सावित्रीबाई फुले जयंतीला अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले.




१२/०१/२०२२ ल स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ हयांच्या जयंती ल युवा दिवस साजरा




२५/०१/२०२२ मतदार जनजागृती मनवीला गेला.



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नित
दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित
श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला
राष्ट्रीय सेवा योजना
" राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त "
महाविद्यालयीनस्तरीय निबंध आणि चित्रकला स्पर्धा

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्य रासेयो तर्फे निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.




३०/०१/२०२२ रोजी महात्मा गांधीजी ह्यांची पुण्यतिथी ला अभिवादन




दिनांक १९/०२/२०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज ह्यांची जयंती साजरी




२३/२/२०२२ ल संत गाडगे महाराज जयंती साजरी केली.





२ आणि ३ मार्च २०२२ ला संगाबा अम. विद्यापीठ च्या दोन दिवसीय अकोला जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेला सहभागी झालेले रासेयो च्या डॉ. रश्मी जोशी व विद्यार्थी.

<table>
<tr>
<td>
</td>
<td>
</td>
</tr>
<tr>
<td>विशेष शिबिराला रासेयो चे संचालक मा. डॉ. राजेशजी बुरंगे ह्यांनी साद्दीछा भेट दिली व मार्गदर्शन केले.</td>
<td>संगाबा अम. विद्यापीठ चे अकोला जिल्ह्याच्या विशेष शिबिराला देऊळगाव येथे डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांनी भेट दिली.</td>
</tr>
<tr>
<td>
</td>
<td>
</td>
</tr>
<tr>
<td>दि. ११/४/२०२२ रोजी महात्मा ज्योतिबा फुले ह्यांची जयंती, त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.</td>
<td>१४/४/२०२२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ला “भारताचा सांविधान” ह्या विषयावर मान. प्रा. पळसपगार ह्यांनी व्यख्यान दिले.</td>
</tr>
</table>


उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय सेवा योजना
'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत
आज़ादी का अमृत महोत्सव









25/04/2022 रोजी SNDT विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई येथे 2019-20 या वर्षाचे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा पार पडला. डॉ. रश्मी जोशी सावळकर यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार आणि श्री आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोला यांना 2019-20 या वर्षासाठीचा सर्वोत्कृष्ट NSS युनिट म्हणून गौरविण्यात आले. 2016-17 चा राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार श्री. अतुल राऊत यांना प्रदान करण्यात आले. सर्व पुरस्कार मा. राज्यमंत्री श्री उदयजी सामंत, उच्च शिक्षण व तंत्रज्ञान ह्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.




राज्यस्तरीय पुरस्कार २०१९- २० प्राप्त महाविद्यालय एकक करिता प्राचार्य डॉ. वी. डी. नानोटी, सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी आणि सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक असे ३ पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल सं.गा.बा. अम. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. प्रदीप मालखेडे ह्यांच्या हस्ते सिनेट सभागृहात सत्कार करण्यात आले. रासेयो चे संचालक मा. डॉ. राजेश बुरंगे ह्यांनी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले.